# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन विभाग)

जा.क्र./महा.वि./गो.वि./ 140 /२०२१ दिनांक : 26 / 07 /२०२१

प्रति,

मा. प्राचार्य,
हायटेक कॉलेज ऑफ फार्मसी,
मोरवा, चंद्रपूर

विषयः– शैक्षणिक सत्र २०२१–२२ मधील विद्यार्थी प्रवेशाकरीता संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.
संदर्भः– १. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेAnnnexure-3 of Item No.8(1-898) 112th CC Meeting Dated 10/06/2021
२. आपले पत्र क्र. १२५६/२१ दि. १५/०७/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ (त्र) (ट) १०८, ११०, ११४ व ११७ (२) मधील तरतुदीनुसार आपल्या महाविद्यालयाअंतर्गत चलित सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमाचे सत्र २०२१–२२ व त्यापुढील साठीचे निरंतर संलग्निकरण प्रदान करण्यासंदर्भात विद्याविषययक लेखापरिक्षण करण्याच्या अटीवर खालील प्रमाणे नमुद अभ्यासक्रमासाठी निरंतर संलग्निकरणाचा कालावधी सत्र २०२१–२२ करीता अस्थायी/तात्पुरता वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विद्याशाखा | अभ्यासक्रम/विषय | प्रवेश क्षमता | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | **Science & Technology** | **B.Pharm** | १०० | सत्र २०२१–२२ करीता |

मा. प्र–कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये,

( डॉ. जी. डी. दुबे )
उपकुलसचिव प्र. (म.वि.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपीः–१) मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
२) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

जा.क्र./गो.वि./महा.वि./ 342 /२०२१ दिनांक : 08/ 9 /२०२१

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव,

**श्री तुळजाभवानी सेवाभावी सामाजीक व शैक्षणिक शिक्षण संस्था,**
**द्वारा संचालीत हायटेक कॉलेज ऑफ फार्मसी, मोरवा, चंद्रपूर**

विषय:— शैक्षणिक सत्र २०२१—२०२२ पासून नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत.

सदर्भ:— १. शासन आदेश टिईएम—२०२१/प्र.क्र.११०/तांशि—४ दि. २९ जुलै, २०२१

२. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे मान्यता पत्र क्र. 112th CC Dated 10/06/2021 Decision

३. महाविद्यालयाचे पत्र क्र. एम.फार्म/१० दि. ०३/०८/२०२१ प्राप्त दि. ०६/०८/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भांकित पत्रानुसार राज्य शासनाने आपल्या संस्थेअंतर्गत **हायटेक कॉलेज ऑफ फार्मसी, मोरवा, चंद्रपूर** या महाविद्यालयाला नविन अभ्यासक्रम कायम विना अनुदान तत्वावर सुरू करण्यास दिलेल्या परवानगीनुसार व स्थानिक चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्या परिषदेने दिलेल्या मान्यतेने खालीलप्रमाणे नविन अभ्यासक्रमास शैक्षणिक सत्र २०२१—२२ पासून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नावं व ठिकाण | विद्याशाखा /अभ्यासक्रम व विषय | विद्यार्थी संख्येचे निकष |
|---|---|---|---|
| **श्री तुळजाभवानी सेवाभावी सामाजीक व शैक्षणिक शिक्षण संस्था, कोठारी** | **हायटेक कॉलेज ऑफ फार्मसी, मोरवा, चंद्रपूर** | **M. Pharm- Pharmaceutics**<br>**M. Pharm-Pharmacognosy** | **15**<br>**15** |

वरील नविन अभ्यासक्रमास खालील अटी व शर्ती लागू राहतील.

१. उपरोक्त नवीन अभ्यासक्रमाला देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत स्थानिक चौकशी समितीने महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

- Two additional laboratories for new course M. Pharm- Pharmaceutics-15 And M. Pharm-Pharmacognosy-15 shall be create next year with required facilities.

२. संदर्भांकित शासन परवानगीमध्ये नमूद केलेले संपूर्ण अटीचे पालन संस्थेने/महाविद्यालयाने विहीत कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या अटीवर संलग्निकरण देण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६) च्या कलम १०९ व ११० नुसार ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०२१—२२ साठी देण्यात येत आहे.

४. विद्यार्थी संख्येचे निकष शासन निर्णय क्र. एनजीसी — १०९३/(५९१८)/मशि—३, दिनांक १९ जुन, १९९५ प्रमाणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील.

५. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोग/अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली/फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व्दारे विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करून त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करून विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक बांबी संदर्भात सर्वस्वी जबाबदारी संस्थेवर राहील.

७. उपरोक्त नविन अभ्यासक्रमाची परवानगी नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश रद्द होतील.

८. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमिका विद्यापीठाच्या अध्यादेशामध्ये राहणार नाही, असे अभ्यासक्रम/विषय महाविद्यालयांनी सुरू करू नये व विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नये. विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास त्याची जबाबदारी संबंधीत संस्था व महाविद्यालयाची राहील.

९. विद्यापीठ अनुदान आयोगाने ( ॲफिलिएशन ऑफ कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज) रेग्युलेशन २००९/अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली/फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली मध्ये महाविद्यालयांना संलग्निकरण देण्याबाबत विहित निकषांची पुर्तता व वरील नमुद सर्व अटींची पूर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल. तसेच पुढील सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/संस्थेची राहील, याची नोंद घ्यावी.

१०. महाविद्यालयातील सदर अभ्यासक्रमाचे पुढील वर्षासाठी विद्याविषयक लेखापरिक्षणाकरीता शुल्कासह आवेदनपत्र विद्यापीठात सादर करावे.

मा. प्र—कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने

(श्री देवेंद्र एम. झाडे)
सहाय्यक कुलसचिव (म.वि)
महाविद्यालय विभाग

प्रतिलीपी माहीतीस्तव व पुढील कार्यवाहीस सादर:—

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुबंई.
२. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
३. मा. विशेष समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण कार्यालय, चंद्रपूर जि. चंद्रपूर
४. मा. संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ,यांना विनंती करण्यात येते की, सदर अभ्यासक्रमामध्ये प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी प्रवेशित विद्यार्थी संख्या दिसून आल्यास अभ्यासक्रम /विषय/अतिरीक्त तुकडी रद्द करण्याकरीता विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांना शिफारस करावी.
५. मा.वित्त व लेखा अधिकारी
६. उपकुलसचिव, विद्या विभाग,
७. उपकुलसचिव, विद्यापीठ विकास विभाग
८. उपकुलसचिव परीक्षा व मुल्यमापन मंडळ, गोपनिय विभाग,
९. संगणक विभाग
१०. सांख्यिकी विभाग

(४ ते १० :) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

श्री देवेंद्र एम. झाडे
सहाय्यक कुलसचिव (म.वि)